MHPU180001102010

## निशाणी क्र.१६९ वरील आदेश
## (दिनांक १४.०२.२०२३)

१. प्रस्तुत अर्ज वादी क्र. १ तर्फे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी दाखल केलेला आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. १ ते ८ यांनी दावा हा प्रतिवादी यांचेविरुध्द जाहीर ठराव व मनाईकरीता तसेच दावा मिळकतीचे खरेदीखत रद्द करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांनीही दावा मिळकतीची बेकायदेशीर विक्री केल्यापासुन ते त्यांचे वकील मे. कोर्टामध्ये दर तारखेस हजर राहात नव्हते व नाही. तसेच वादी यांनी दाव्यामध्ये त्यांचे साक्षी सरतपासणीचे सत्यप्रतिज्ञापत्र नि. १०८ वर दाखल केलेले आहे. त्याकामी प्रतिवादी क्र. १ ते ११ यांनी वादीचा उलटतपास घेणेकामी मे. कोर्टाने वेळोवेळी तारखा नेमलेल्या होत्या व आहे, असे असतांना सदर दाव्यातील प्रतिवादी क्र. १५ यांच्या वकीलांनी मे. कोर्टास तोंडी कथन केले की, प्रतिवादी क्र. १ हे मयत झालेले आहेत. त्यानंतर दि. २९/११/२०१८ रोजी नि. ११५ वर प्रतिवादी क्र. १ यांचा मृत्युचा दाखला मे. कोर्टात दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादी क्र. १ यांचे वकीलांनी अथवा दाव्यातील इतर प्रतिवादींनी प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांची कोणत्याही प्रकारची कायदेशीर माहिती दिलेली नाही व प्रतिवादी क्र. १ यांना किती वारसदार आहेत, त्यांचे नाव, पत्त्यासहीत मे. कोर्टात दाखल केलेला नाही. अशी वस्तुस्थिती असतांना वादी यांनी प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांचे कायदेशीर असणा–या वारसांविषयी चौकशी करुन माहिती प्राप्त केली आहे. त्यामुळे वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई यांचे वारस रेकॉर्डवर घेणेकामी अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांना खालीलप्रमाणे विजय नानासाहेब सोनवणे प्रतिवादी क्र. १अ म्हणुन वारसदार आहेत. सबब सरनाम्यातील प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे यांच्या नावाला कंस करुन पुढे मयत वारस असे नमुद करुन वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

२. प्रतिवादी क्र.१५ यांनी सदर अर्जावर जबाब लिहुन दिला आहे. त्यांचे असे कथन आहे की, वादीने सदरचा अर्ज विलंबाने दाखल केलेला आहे. तो रद्द करावा. तथापि मे. साहेबांचे मत अर्ज मंजुर करणेबाबत झाले तर सदर वारस रेकॉर्डवर घेण्याकामी रुपये ५,०००/– कॉस्टचा आदेश करुन सदरची रक्कम प्रतिवादी क्र. १५ यांना देववावी बाबत आदेश करुन अर्ज मंजुर करणेस हरकत नाही.

४. प्रतिवादी क्र. १४ यांचेविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश दि.

१६/०७/२०१४ रोजी तसेच प्रतिवादी क्र. ५अ ते ५क विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचे आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झाले आहे. तसेच प्रतिवादी क्र. २, ३, ४, ६ ते १३ यांचेविरुध्द दावा विनाकैफियत चालविण्यात येण्याचा आदेश दि. १२/०४/२०१८ रोजी झालेला आहे.

५. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस.बी.चव्हाण व प्रतिवादी क्र. १५ तर्फे विद्वान वकील श्री. बी.व्ही.देशमुख यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकला.

६. अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, दि. ०३/०४/२०१० रोजी वादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुत दावा जाहीर ठराव व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. दि. ०७/०४/२०१० रोजी दाव्यास क्रमांक पडलेला आहे. त्याचदिवशी प्रतिवादींना समन्स काढण्याचे आदेश झालेला आहे. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. १०३ अन्वये त्यांची कैफियत व जबाब दाखल केलेला आहे. माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १३/०७/२०१८ रोजी नि. १०७ अन्वये मुद्दे काढलेले आहे. त्यानंतर दावा वादीच्या पुराव्याकरीता नेमण्यात आला. वादी क्र. १ विश्वनाथ राधु उर्फ राघोबा मोरे यांनी त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दि. ०१/१०/२०१८ रोजी नि. १०८ अन्वये दाखल केलेले आहे. त्यांचा पुढील सरतपास व उलटतपास होण्यापुर्वी वादी क्र. १ हे दि. ०३/११/२०२० रोजी मयत झाले व त्यांचे नावापुढे मयत असे लिहुन त्याचे वारस म्हणुन १अ ते १ड यांना दाव्यात सामील करुन दुरुस्ती केलेली आहे. प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झालेली आहे. त्यांचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यामुळे दावा त्यांचे विरुध्द अबेट झाल्याचा आदेश माझे पुर्वाधिकारी यांनी दि. १२/०६/२०१९ रोजी झालेला आहे. तो आदेश रद्द करण्यासाठी वादीतर्फे दि. १९/०६/२०१९ रोजी अबेटमेंट सेट असाईडचा अर्ज नि. १६७ दाखल केलेला आहे. त्यावर आज रोजी आदेश होउन खर्च लादुन तो अर्ज मंजुर झालेला आहे. प्रतिवादी क्र. १५ यांनी नि. ११५ अन्वये पुरसीस नुसार प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नाना सोनवणे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाले असुन त्यांना मुलगा विजय व मुलगी शांताबाई एक मयत मुलीचे वारस असे वारसदार आहेत असे कथन केले आहे. तसेच नि. ११७ यादीलगत कोंडाबाई नाना सोनवणे यांचा मृत्युचा दाखला नि. ११८ वर दाखल केलेला आहे. नि. ११८ वरील मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता कोंडाबाई नाना सोनवणे हे दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झाल्याचे दिसते. प्रतिवादी क्र. १५ यांनी दि. २९/११/२०१८ रोजी म्हणजे प्रतिवादी क्र. १ मयत झाल्यानंतर ९७ दिवसांनंतर पुरसीस अन्वये प्रतिवादी क्र. १ मयत असल्याचा दाखला व त्यांच्या वारसांची माहिती दिल्याचे नि. ११५ व ११८ वरुन दिसुन येते. त्यानंतर दि. १९/०६/२०१९

रोजी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. नि. १६७ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश खर्च र.रु. १,०००/– प्रतिवादी क्र. १५ यांना दिल्यानंतर रद्द होईल असा आदेश मी केलेला आहे. तसेच नि. १२६ वरील आदेशानुसार प्रतिवादी क्र. १ चे वारस विजय नानासाहेब सोनवणे यांना रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्याचा अर्ज खर्च र.रु. १००/– सह मंजुर केला आहे.

७. प्रतिवादी क्र. १ दि. २३/०८/२०१८ रोजी मयत झालेले आहे. त्यानंतर दि. १९/०६/२०१९ पावेतो वादी यांना प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी ६ महिने व २७ दिवसांचा विलंब झालेला दिसुन येतो. तो विलंब जाणीवपुर्वक झालेला दिसुन येत नाही. दावा हा निरंतर ताकीद व जाहीर ठराव याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १ चे वारस म्हणुन १अ यांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. तसेच नि. १२९ पुरसीस नुसार प्रतिवादी क्र. १ यांना शांताबाई बबन गायकवाड, कांताबाई नंदु रणधीर – मयत वारस राहुल नंदु रणधीर, सौ. पायल गायकवाड असे वारस आहेत हे दि. ०१/१०/२०१९ रोजी कळविले आहे. म्हणुन प्रतिवादी क्र. १५ यांना खर्च रक्कम म्हणुन द्यावी असे मला वाटत नाही. उपरोक्त सर्व विवेचन, कारणास्तव प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. करीता मी खालील आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१६९ हा मंजुर करण्यात येतो.

२. नि. १६७ व १२६ वरील आदेशाची पुर्तता झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ कोंडाबाई नानासाहेब सोनवणे चे वारस म्हणुन प्रतिवादी क्र. १अ विजय नानासाहेब सोनवणे यांना रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देण्यात येईल

३. वादी क्र. १ यांनी त्यानुसार दाव्यात दुरुस्ती करावी व दावा दुरुस्तीची प्रत रेकॉर्डवर दाखल करावी.

४. वर नमुद १ ते ३ बाबींची वादी क्र. १ व त्यांच्या वकिलांनी नोंद घ्यावी.

JYOTI BHARAT GOYAL
Digitally signed by JYOTI BHARAT GOYAL
Date: 2023.02.15 13:06:44 +0530

(श्रीमती. जे.एस.खेडकर–गोयल)

दि.१४.०२.२०२३

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दौंड
ता.दौंड, जि. पुणे

C E R T I F I C A T E

"I affirm that the contents of this PDF file Order are same word for word as per original Order"

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | :- | P.D.Jagatap |
| Court name | : | Smt. J. S. Khedkar-Goyal,<br>J.M.F.C, (Court no.1), Daund,<br>Tq.Daund, Dist.Pune |
| Order date | : | 14/02/2023 |
| Order signed by | : | |
| Presiding Officer on | : | 14/02/2023 |
| Order uploaded on | : | 15/02/2023 |